# जिल्हयातील उत्कृष्ट लघु उद्योजकांना जिल्हा पुरस्कार योजना

सदर योजना राज्य शासनाची योजना असून जिल्हास्तरावर जिल्हा उद्योग केंद्रामार्फत सन १९८५ पासून कार्यरत आहे.

## योजनेच्या अटी आणि शर्थी

*अर्जदार घटक हा जिल्हयातील स्थाई नोंदणीकृत घटक असावा
*पुरस्कार वर्षाच्या मागिल ३ वर्षापूर्वी स्थाई नोंदणीकृत झालेला व मागिल २ वर्षे सलग उत्पादनात असलेला असावा.
*यापूर्वी जिल्हा पुरस्कार अथवा राष्ट्रीय/आंतरराष्ट्रीय पुरस्कार प्राप्त उद्योग घटक नसावा
*अर्जदार घटक कोणत्याहि वित्तीय संस्थेचा थकबाकीदार नसावा

## कार्यप्रणाली

या योजनेअंतर्गत वरील अटींची पुर्तता करणा-या या कार्यालयास स्थाई नोंदणीकृत घटकास कार्यालयामार्फत योजनेची माहिती देवून पात्र उद्योग घटकांकडून विहित नमुन्यात अर्ज मागविण्यात येतात. अर्ज प्राप्त झाल्यानंतर पात्रतेच्या अनुषंगाने सदर अर्जाची तपासणी करण्यात येते. तदनंतर जिल्हास्तरावर मा.जिल्हाधिकारी यांचे अध्यक्षतेखाली खालीलप्रमाणे उपसमिती नेमून त्यामार्फत अर्जदार घटकांना प्रत्यक्ष भेट देवून घटकाने अर्जात नमुद केलेल्या माहितीची खात्री करण्यात येते व सदर खात्रीनंतर उपसमितीचे सभासद सदर घटकास गुणवत्तेच्या निकषानुसार गुण देतात. त्यानंतर मा.जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष जिल्हा सल्लागार समिती यांचे मान्यतेने प्रथम व द्वितीय पुरस्कारासाठी घटकांची निवड करण्यात येते व सदर निवडी यथावकाश जिल्हा सल्लागार समिती सभेमध्ये कार्योत्तर मंजुरी घेतली जाते.

## निवड उपसमिती

| | |
|---|---|
| १.महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र, | अध्यक्ष |
| २.एमआयडीसीचे प्रतिनिधी | सदस्य |
| ३.जिल्हा खादी ग्रामोद्योग अधिकारी | सदस्य |
| ४.जिल्हा अग्रणी बँक व्यवस्थापक | सदस्य |
| ५.व्यवस्थापक, जि.उ.कें. | सदस्य सचिव |

## पुरस्काराचे स्वरुप

राज्य शासनाने ठरवून दिल्याप्रमाणे प्रथम पुरस्कार विजेत्या उद्योजकास रु.१५०००/- धनाकर्ष, शाल, श्रीफळ व मानचिन्ह देवून समारंभपूर्वक शासकीय कार्यक्रमांत गौरविण्यात येते.

द्वितीय पुरस्कार विजेत्या उद्योजकास रु.१००००/- धनाकर्ष, शाल, श्रीफळ व मानचिन्ह देवून समारंभपूर्वक शासकीय कार्यक्रमांत गौरविण्यात येते.